जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 MAR 2025
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित समूह युवा संसद स्पर्धेत सादरीकरण करताना विद्यार्थी. (छाया : नाज ट्रेनर)

# विद्यार्थ्यांनी संसदीय कार्यपद्धतीचा गांभीर्यपूर्वक अभ्यास करावा

## कुलगुरू डॉ. शिर्के; समूहस्तरीय युवा संसद स्पर्धेचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केवळ राज्यशास्त्राच्याच नव्हे तर सर्वच अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी संसदीय कार्यपद्धतीचा गांभीर्यपूर्वक अभ्यास करावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

संसदीय कार्य मंत्रालयाच्या वतीने आयोजित समूहस्तरीय युवा संसद स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, संसदीय राजकारण हा सार्वत्रिक अभ्यासाचा विषय आहे. संविधानिक मूल्यांचे जतन करण्यासाठी विद्यार्थ्यांना युवा संसदसारख्या उपक्रमातून चालना मिळते. शपथविधीपासून ते कायदानिर्मिती प्रक्रियेपर्यंत सर्व घटकांचा समावेश असलेल्या उपक्रमात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने उत्तम सादरीकरण केले. गायत्री सोनवणे, तेजस सन्मुख, संदेश लडकट, श्रेया म्हापसेकर, स्वप्नील माने, विश्वजित पाटील या सहा विद्यार्थ्यांची उत्कृष्ट संसदरत्न म्हणून निवड करण्यात आली.

स्पर्धेच्या मूल्यांकनासाठी डॉ. दिनेश अरोरा, डॉ. वैशाली पवार उपस्थित होत्या. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. तानाजी चौगुले, सुरेखा आडके उपस्थित होते. डॉ. प्रल्हाद माने यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. संतोष सुतार, डॉ. कविता वड्राळे, आकाश ब्राह्मणे, डॉ. अतुल जाधव आदींनी संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 MAR 2025

तरूण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित समूह युवा संसद स्पर्धेत सादरीकरण करताना शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी–विद्यार्थिनी.

# विद्यार्थ्यांनी संसदीय कार्यपद्धतीचा गांभीर्यपूर्वक अभ्यास करावा

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

केवळ राज्यशास्त्राच्याच नव्हे, तर सर्वच अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी संसदीय कार्यपद्धतीचा गांभीर्यपूर्वक अभ्यास करावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले.

संसदीय कार्य मंत्रालयाच्या वतीने आयोजित समूहस्तरीय युवा संसद स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, संविधानिक मूल्यांचे जतन करण्यासाठी विद्यार्थ्यांना युवा संसदसारख्या उपक्रमातून चालना मिळते. या स्पर्धेचे मूल्यांकन करण्यासाठी जालंधर (पंजाब) येथील डी. ए. व्ही. महाविद्यालयाचे डॉ. दिनेश अरोरा (समूह समन्वयक) आणि पुण्याच्या शाहू विद्यामंदिर महाविद्यालयाच्या डॉ. वैशाली पवार (शिक्षणतज्ज्ञ परीक्षक) उपस्थित होते. शपथविधीपासून ते कायदानिर्मिती प्रक्रियेपर्यंत सर्व घटकांचा समावेश असलेल्या या उपक्रमात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने उत्तम सादरीकरण केले. गायत्री सोनवणे, तेजस सन्मुख, संदेश लडकट, श्रेया म्हापसेकर, स्वप्नील माने, विश्वजित पाटील यांची उत्कृष्ट संसदरत्न म्हणून निवड करण्यात आली. डॉ. प्रल्हाद माने यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. डॉ. सुखदेव उंदरे, डॉ.सुतार, डॉ. वड्राळे, आकाश ब्राह्मणे, डॉ. जाधव आदींनी संयोजन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले, सुरेखा आडके आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 MAR 2025
सकाळ



कोल्हापूर : समूह युवा संसद स्पर्धेत सादरीकरण करताना शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी.

# युवा संसद स्पर्धेत सहा जण ठरले उत्कृष्ट संसदरत्न

कोल्हापूर, ता. २५ : संसदीय कार्य मंत्रालयातर्फे आयोजित समूहस्तरीय युवा संसद स्पर्धेत शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. त्यातून गायत्री सोनवणे, तेजस सन्मुख, संदेश लडकट, श्रेया म्हापसेकर, स्वप्नील माने, विश्वजित पाटील या सहा विद्यार्थ्यांची उत्कृष्ट संसदरत्न म्हणून निवड करण्यात आली.

या स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. 'केवळ राज्यशास्त्राच्याच नव्हे, तर सर्वच अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी संसदीय कार्यपद्धतीचा गांभीर्यपूर्वक अभ्यास करावा. संसदीय राजकारण हा सार्वत्रिक अभ्यासाचा विषय आहे. संविधानिक मूल्यांचे जतन करण्यासाठी विद्यार्थ्यांना युवा संसदसारख्या उपक्रमातून चालना मिळते', असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

या स्पर्धेचे मूल्यांकन करण्यासाठी जालंधर (पंजाब) येथील डी. ए. व्ही. महाविद्यालयाचे डॉ. दिनेश अरोरा (समूह समन्वयक) आणि पुण्याच्या श्री शाहू विद्यामंदिर महाविद्यालयाच्या डॉ. वैशाली पवार (शिक्षणतज्ज्ञ परीक्षक) उपस्थित होते.

शपथविधीपासून ते कायदानिर्मिती प्रक्रियेपर्यंत सर्व घटकांचा समावेश असलेल्या या उपक्रमात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने उत्तम सादरीकरण केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले, सुरेखा आडके, समन्वयक डॉ. प्रल्हाद माने उपस्थित होते. डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. संतोष सुतार, डॉ. कविता वड्राळे, आकाश ब्राह्मणे, डॉ. अतुल जाधव आदींनी स्पर्धेचे संयोजन केले.

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# विद्यार्थ्यांनी संसदीय कार्यपद्धतीचा गांभीर्यपूर्वक अभ्यास करावा : कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज):**

केवळ राज्यशास्त्राच्याच नव्हे, तर सर्वच अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी संसदीय कार्यपद्धतीचा गांभीर्यपूर्वक अभ्यास करावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. संसदीय कार्य मंत्रालयाच्या वतीने आयोजित समूहस्तरीय युवा संसद स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते काल (दि. २४) बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.



कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, संसदीय राजकारण हा सार्वत्रिक अभ्यासाचा विषय आहे. संविधानिक मूल्यांचे जतन करण्यासाठी विद्यार्थ्यांना युवा संसदसारख्या उपक्रमातून चालना मिळते.

या स्पर्धेचे मूल्यांकन करण्यासाठी जालंधर (पंजाब) येथील डी.ए.व्ही. महाविद्यालयाचे डॉ. दिनेश अरोरा (समूह समन्वयक) आणि पुण्याच्या श्री शाहू विद्यामंदिर महाविद्यालयाच्या डॉ. वैशाली पवार (शिक्षणतज्ज्ञ परीक्षक) उपस्थित होते. शपथविधीपासून ते कायदानिर्मिती प्रक्रियेपर्यंत सर्व घटकांचा समावेश असलेल्या या उपक्रमात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने उत्तम सादरीकरण केले. यावेळी गायत्री सोनवणे, तेजस सन्मुख, संदेश लडकट, श्रेया म्हापसेकर, स्वप्नील माने, विश्वजित पाटील या सहा विद्यार्थ्यांची उत्कृष्ट संसदरत्न म्हणून निवड करण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले, सुरेखा आडके यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. प्रल्हाद माने यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. संतोष सुतार, डॉ. कविता वड्राळे, आकाश ब्राह्मणे, डॉ. अतुल जाधव आदींनी संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
26 MAR 2025
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी वाचनाशी नाते दृढ करावे

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : शिव-शाहू महाविद्यालयाचा पारितोषिक वितरण समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क




सरूड (ता. शाहूवाडी) येथील श्री शिव-शाहू महाविद्यालयाच्या पारितोषिक वितरण समारंभात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी माजी आमदार बाबासाहेब पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते.

**सरूड :** विद्यार्थ्यांनी वाचनाशी असलेले नाते अधिक दृढ करून अभ्यासक्रमाच्या पलीकडील जीवन समजून घ्यावे, तरच यशाच्या वाटेवरून चालता येईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

येथील श्री शिव-शाहू महाविद्यालयाच्या ४१ व्या वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्रारंभी स्वागत आणि प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. टी. दिंडे यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. रघुनाथ मुडळे यांनी करून दिली.

यावेळी संस्थेचे संचालक युवराज पाटील, 'गोकुळ'च्या माजी संचालिका अनुराधा पाटील, संचालक बाळासाहेब पाटणकर, माजी प्राचार्य आय. बी. तांबोळी, माजी प्र. प्राचार्य बी. आर. गाडवे, प्रा. जी. बी. पाटील, प्रा. शिवकुमार सोनाळकर, प्रा. डी. आर. नांगरे, डॉ. के. ए. पाटील, प्रा. एल. टी. आरगे, प्रा. अशोक पाटील, मुख्याध्यापक जी. एस. पाटील, ए. बी. कांबळे, डॉ. धनश्री रोडे-पाटील, श्रद्धा इंगळे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी प्रतिनिधी प्राची घोलप आणि गजानन सातपुते, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. प्रकाश नाईक आणि प्रा. स्नेहल मेथे यांनी केले. प्रा. प्रमोद कुचिवाले यांनी आभार मानले.

**४१**
वा वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# ऑनलाइन फसवणूक टाळण्यासाठी सायबर सुरक्षा गरजेची : आशुतोष कापसे

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज):**
ऑनलाईन फसवणूक टाळण्यासाठी नागरिकांनी, संस्थांनी सायबर सुरक्षेबाबत दक्ष राहणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ऑस्ट्रेलियाच्या फाल्कन लॅब्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशुतोष कापसे यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागातर्फे काल (दि. २४) सायबर सुरक्षा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय): आव्हाने आणि संधी या विषयावर श्री. कापसे यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले.

डिजिटल युगातील सुरक्षा आणि तंत्रज्ञान विकासाच्या क्षेत्रातील आव्हानात्मक पैलूंवर प्रकाश टाकताना कापसे म्हणाले, प्रत्येक व्यक्ती आणि संस्थेला त्यांच्या डेटाच्या सुरक्षिततेसाठी खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे. विशेषतः, डिजिटल युगात वैयक्तिक आणि संवेदनशील माहिती सहज उपलब्ध होते, त्याचे दुरुपयोग टाळण्यासाठी एन्क्रिप्शन आणि नियमित सॉफ्टवेअर अपडेट्सचा वापर करणे गरजेचे आहे. डिजिटल गोपनीयता राखण्यासाठी आणि सुरक्षित डेटा शेअरिंग सुनिश्चित करण्यासाठी, मजबूत प्रमाणीकरण पद्धती आणि विश्वसनीय नेटवर्क सुरक्षा प्रोटोकॉल वापरावेत. फिशिंग हल्ल्यांच्या संदर्भात सातत्याने जागरुक राहणे आवश्यक आहे. सोशल मीडियावर वापरकर्त्यांनी खाजगी माहिती, छायाचित्रे उघड करीत असताना सावधगिरी बाळगावी. कोणतेही प अधिकृत प स्टोअरमधूनच इन्स्टॉल करावे, अन्यथा डेटा चोरीला जाण्याची शक्यता असते. कोणत्याही बँकिंग व्यवहारासाठी कधीही मोफत वायफाय वापरू नका, असा सल्लाही त्यांनी दिला.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या संदर्भात बोलताना कापसे म्हणाले, एआयच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर डेटा विश्लेषण, ऑटोमेशन आणि संशोधन प्रक्रियांमध्ये सुधारणा शक्य आहे. तथापि, एआयचे विश्लेषण आणि निर्णय प्रक्रियेमध्ये अद्यापही मर्यादा असून त्यासाठी मानवी निरीक्षण आणि नियंत्रण आवश्यक आहे. अधिक कनेक्टिव्हिटीमुळे आय.ओ.टी. उपकरणांमध्ये अनेकदा सुरक्षाविषयक त्रुटी आढळतात. अशा परिस्थितीत, योग्य सुरक्षा उपाययोजना न केल्यास हल्ल्यांचा सामना करावा लागू शकतो. या संदर्भात सतर्कता बाळगण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

अध्यक्षीय मनोगतात प्रा. सोनकवडे यांनी तांत्रिक प्रगतीशी संबंधित फायदे आणि जोखीम याबाबत जागरूक राहण्याचे महत्त्व सांगितले. ऑनलाइन फसवणुकीमध्ये गेलेले पैसे परत मिळवणे खूप कठीण असल्याने शेअर बाजाराशी निगडित अधिकृत प्सव्यतिरिक्त इतर पचा वापर करणे धोक्याचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

सुरवातीला डॉ. मानसिंग टाकळे यांनी प्रास्ताविक व परिचय करून दिला. सुप्रिया पाटील आणि वैष्णवी यादव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ए. आर. पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. केशव राजपुरे, डॉ. आण्णासाहेब मोहोळकर, डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. एस. पी. दास, डॉ. व्ही. एस. कुंभार, डॉ. एम. आर. बायकर, डॉ. एस. एस. पाटील आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 MAR 2025
सकाळ

# तंत्रज्ञान अधिविभाग बनला 'स्कूल ऑफ इंजिनिअरिंग'



'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये विविध विद्याशाखांतील अभ्यासक्रमांचे शिक्षण देणारे विभाग, संस्था 'स्कूल' या संकल्पनेत येतात. त्यामध्ये या तंत्रज्ञान अधिविभागाचा समावेश होता. त्यामुळे त्याचे नाव बदलण्यात आले आहे. त्याचा सकारात्मक परिणाम विद्यापीठ आणि या स्कूलमधील शैक्षणिक, संशोधनात होणार आहे.

- डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलसचिव

**कोल्हापूर, ता. २५ :** गेल्या एकोणवीस वर्षांपासून शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या नावात आता बदल करण्यात आला आहे. या विभागाचे 'शिवाजी युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी' असे नामकरण करण्यात आले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास पूरक ठरणारी कार्यवाही या माध्यमातून विद्यापीठ प्रशासनाने केली आहे. त्याला अधिकार मंडळानेदेखील मान्यता दिली आहे.

विद्यापीठात या तंत्रज्ञान अधिविभागाची स्थापना सन २००६-०७ मध्ये झाली. त्यावेळी अधिविभागाचे नाव कोनशिलेवर 'इंटरनॅशनल स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी' असे होते. कालांतराने या नावामध्ये बदल होऊन 'डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी' असे करण्यात आले. या नावावरून त्या विभागात अभियांत्रिकीचे अभ्यासक्रम सुरू असल्याचा बोध होत नव्हता.

ज्यावेळी या विभागात प्रथम वर्ष बी.टेक. अथवा द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने पालक फॅसिलिटेशन सेंटर आणि ॲडमिशन रिपोर्टिंग सेंटरच्या निमित्ताने येतात. त्यावेळी विद्यापीठाचे अभियांत्रिकीचे कॉलेज आहे, ते आजतागायत आपल्याला कल्पना अथवा माहिती नसल्याचे या पालकांकडून सांगण्यात येते. या विभागाची माहिती नसल्याने विद्यार्थी, पालकांकडून प्रवेश प्रक्रियेवेळी कॉलेजचा प्राधान्यक्रम देताना तंत्रज्ञान अधिविभाग भरले जात नव्हते. त्याचा इथल्या प्रवेश प्रक्रियेवर परिणाम होत आहे. त्यावर व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी तंत्रज्ञान अधिविभागाच्या नावामध्ये बदल करण्याची सूचना केली.

त्यांनी स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी, शिवाजी युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी अशी पाच नावे सुचविली होती. त्यापैकी 'शिवाजी युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी' या नावाची निवड केली.

2 6 MAR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दोन एप्रिलपासून उन्हाळी सत्रातील परीक्षा

**कोल्हापूर, ता. २५ :** शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षांचा प्रारंभ दोन एप्रिलपासून होणार आहेत. त्याबाबतचे वेळापत्रक परीक्षा व मूल्यमापन मंडळाने जाहीर केले आहे.

या सत्रात पदवी-पदव्युत्तर कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, सर्व पदविका, प्रमाणपत्र, बी. व्होक., यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमधील अभ्यासक्रम, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, टेक्सटाईल्स, बी.टेक., विधी, एमबीए, इतर सर्व प्री-पीएचडी, आदी स्वरूपातील ८५० परीक्षा होणार आहेत. त्यासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या दोन लाख ५० हजार इतकी आहे. परीक्षांच्या तारखा लक्षात घेऊन कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालये आणि विद्यापीठ कॅम्पसवरील अधिविभागांनी वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करावा, अशी सूचना परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केली आहे. दरम्यान, या सत्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे अर्ज भरण्यास परीक्षा मंडळाने विनाविलंब शुल्कासह २८ मार्चपर्यंत, विलंब शुल्कासह एक एप्रिल, तर अतिविलंब शुल्कासह तीन एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 MAR 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे परीक्षा अर्ज भरण्यास २८ पर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील उन्हाळी सत्रामध्ये होणाऱ्या पदव्युत्तर परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार संलग्न महाविद्यालये, अधिविभागातील विद्यार्थ्यांना २० ते २८ मार्चदरम्यान विनाविलंब शुल्क अर्ज भरता येणार आहे. विलंब शुल्कासह २९ मार्च ते १ एप्रिल व अतिविलंब शुल्कास २ व ३ एप्रिलपर्यंत अर्ज करता येणार आहे. महाविद्यालय, अधिविभागांनी २९ मार्च ते ४ एप्रिल या कालावधीत विद्यापीठाकडे शुल्क जमा करावयाचे आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 MAR 2025

पुढारी

# विद्यापीठात आज महाराष्ट्र अर्थसंकल्पावर परिसंवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातर्फे बुधवारी (दि. २६) 'महाराष्ट्राचा अर्थसंकल्प २०२५-२६' या विषयावर एकदिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. अर्थशास्त्र विभागाच्या सेमिनार सभागृहात सकाळी १० वाजता हा परिसंवाद होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, मानव्यशास्त्र विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत परिसंवादाचे उद्घाटन होणार आहे. परिसंवादात विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. ज्ञानदेव तळुले, वाणिज्य अधिविभागाचे डॉ. केदार मारुलकर, ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार, आयसीएआय कोल्हापूरचे चेअरमन नितीन हरगुडे, सीआयआय दक्षिण महाराष्ट्र विभागाचे चेअरमन सारंग जाधव आणि डॉ. सुभाष कोंबडे सहभागी होणार आहेत. प्रा. डॉ. प्रकाश कांबळे अध्यक्षस्थानी असतील.

2 6 MAR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात योग निसर्गोपचार कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे योग निसर्गोपचार क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित कार्यशाळा निलांबरी सभागृहात झाली. डॉ. रामचंद्र पवार यांनी विद्यार्थ्यांना नवीन कौशल्य आत्मसात करून स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा सल्ला दिला. अरविंद पालके यांनी योग निसर्गोपचार क्षेत्राची व्याप्ती स्पष्ट केली. यावेळी डॉ. प्रकाश राऊत यांनी स्टार्टअप व उद्योजकता संधी, गणेश गोडसे यांनी योग निसर्गोपचार उद्योजकांसाठी बँकिंग प्रणाली या विषयांवर मार्गदर्शन केले.